REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 6 | MARCH - 2018

# संसदीय शासन पध्दतीचा उदय आणि विकास

प्रा. पांडुरंग मा. नवल
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
स्वामी विवेकानंद वरीष्ठ महाविद्यालय, मंठा.

**प्रस्तावनाः—**



कोणत्याही राष्ट्राची प्रगती ही त्या राष्ट्राने स्विकृत केलेल्या शासन पध्दतीवर अवलंबुन असते. देशाची आंतरराष्ट्रीय नीती अंतर्गत सलोखा कायदा—सुव्यवस्था या परिस्थितीची पायाभरणी भक्कम करण्यासाठी एका विचारसरणीचे धोरण स्वीकारुन जागतिक राजकारणात आपल्या राष्ट्राची स्थान निर्माण करण्यासाठी एका शासन पध्दतीचा अंगीकार करणे अगत्याचे असते. म्हणुन जगभरातील राष्ट्राने आपल्या राष्ट्राला अनुकुल अशी शासन पध्दती स्विकारलेली दिसते. वेगवेगळया राष्ट्रांनी आपल्या राष्ट्राला जी अनुकुल शासन प्रणाली आहे त्याचा स्विकार केला आहे. काही राष्ट्रात राजेशाही काही राष्ट्रात हुकुमशाही तर काही राष्ट्रात लोकशाही शासन पध्दतीचा स्वीकार पहायला मिळतो. भारत यापैकी एक राष्ट्र दिडशे वर्षे ब्रिटीशांच्या अधिपत्याखाली राहुन त्यांच्या अनेक धोरणांचा व विचारसरणीचा प्रभाव भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतद देखील स्वातंत्र्योत्तर कालखंडातील शिकारीला धोरणात झालेला आहे. भारताने संसदीय शासन पध्दतीचा स्विकार केला आहे. इंग्लंड ही संसदीय शासन पध्दति जननी म्हणुन ओळखली जाते हे जरी सत्य असले तरी भारताने ही पध्दती स्विकारतांना ब्रिटीश संस्थांची रोपे इंग्लंडहुन आणुन येथे रोवली असे नाही. भारतीय संसद आणि संसदीय संस्थांची मूल्ये येथील मातीतच रुजवण्यात आली व ती सहजपणे येथे वाढली भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी विदेशी राज्यकर्त्यांची दीर्घकाळ संघर्ष द्यावा लागला आणि यातूनच लोकशाही संस्थांची पाळेमुळे भक्कम झाली.

आज संसदीय लोकशाहीच्या माध्यमातून जगातील अनेक राष्ट्रीय प्रगतीची पावले टाकीत आहेत. प्लेटोच्या काळापासून अठराव्या शतकापर्यंत लोकशाही निंदनिय परिस्थितून जात होती मात्र एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच सन्मानाची भावना लोकशाही ला मिळाली. पहिल्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर लोकशाहीसाठी आंदोलने तीव्र झाली. राजेशाही आणि हुकुमशाही यांच्यावर टीका होऊन लोकशाहीचे स्थान बळकट झाली.

**संशोधनाची उद्दिष्टे :—**

1) संसदीय शासन पध्दतीचा अभ्यास करणे
2) संसदीय शासन पध्दती लोकशाहीसाठी वरदान
3) संसदीय शासन पध्दती विरोधी पक्षाचा सन्मान होतो.
4) संसदीय शासन पध्दति जनमताचा आदर होतो.

**गृहितके :—**

1) संसदीय शासन एक आदर्श व्यवस्था
2) संसदीय शासन पध्दती सर्वांचा सहभाग असतो.

3) संसदीय शासन पध्दती आदर्श व्यवस्था
4) संसदीय शासन पध्दती ब्रिटीश कालीन मुल्य रुजली आहेत.

## संशोधन पध्दती :—

प्रस्तुत संशोधन पेपर साठी दुय्यम साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथ मासिके साप्ताहिके वर्तमानपत्रांचा अभ्यास केला आहे.

## संसदीय शासन पध्दतीची ऐतिहासिक पार्श्वभूमी :—

संसदीय शासन पध्दतीची जननी म्हणून इंग्लंड ला ओळखले जाते ही पध्दती सर्वप्रथम तिथे रुढ होती ही पध्दती मानवी मुल्यांचा व व्यक्ती कल्याणासाठी सर्वांना समान संधी अंगीकारत असल्याने जगभरात या पध्दतीचा स्विकार मोठया प्रमाणात झालेला आहे. प्राचीन काळाचा विचार केला असता लोकशाहीचे पुरक प्रयोग हे ग्रीक आणि अथेन्स या नगर राज्यात पाहावयास मिळतात अथेन्स या नगरात जनतेने घेतलेल्या महत्वाच्या निर्णयाला अंमलात आणण्यासाठी एक समिती रुढ होती आणि या समितीत असणारे सभासद व अधिकारी हे प्रामुख्याने जनतेकडुन निवडुन पाठवले जात असत यावरुन लोकशाहीची प्रक्रिया खुपच प्राचीन आहे हे सिध्द होते. नंतरच्या काळात ग्रीक रोमन प्रजासत्ताकाचे प्रयोग केले आणि याच प्रक्रियेतून रोमराज्य लोकशाहीचा जन्म झाला. आणि रोम हे नगराचे लहान असले तरी पुरोगामी विचारांचे ते जन्मदाते ठरलेले आहेत. भारतीय पुराणातही संसदीय शासन पध्दतीचे संदर्भ आढळतात.

इंग्लंडची संसदीय शासनाची जननी याचे दाखले हे मॅग्ना कार्टा 1215 मिळतात कारण ही सनद म्हणजे ब्रिटीश शासन संविधानाचा प्रारंभ करणारा दस्ताऐवज आहे. ही सनद मुळात सरंजामी व सरदार यांच्या संघर्षातून जन्माला आले. म्हणुनच इंग्लंडच्या इतिहासात यास खास महत्व आहे. समवेत समाविष्ट करणे हे प्रामुख्याने व्यक्ती हिताचा विचार करुन मूलभूत हक्कासंबंधी बाबी विशद करण्यात आलेले आहेत.

## भारतीय संसदीय शासन प्रणाली स्विकृतीचा ऐतिहासिक आढवा :—

भारत हे एक ब्रिटीशांची वसाहत असणारे राष्ट्र होते त्यामुळे सहाजिकच ब्रिटीशांच्या कायद्याचा आणि काही अधिकारांचा प्रभाव हा भारतीय शासन पध्दतीत झालेला दिसतो. ब्रिटीश राजवटी मधील कायदे व शासन भारतीय संसदीय शासन प्रणालीत ओतप्रोत भूमिका पार पाडताना दिसतात. भारतीय संसदीय व्यवस्था ही ब्रिटीश शासनाची देणगी म्हणून संबोधली जाते. इंग्लंडची राणी ऐलिझाबेथ हिने 31 डिसेंबर 1818 रोजी एक लक्ष केंद्रित करण्यासाठी ईस्ट इंडीया कंपनीची स्थापना केली. या कंपनीचा मुळ हेतु हा व्यापार करणे हा होता. त्यासाठी त्यांनी मुंबई मद्रास कलकत्ता या ठिकाणी कंपन्या स्थापन केल्या आणि याच माध्यमातून भारताचे शासन आणि कायदे यावर वर्चस्व स्थापन केले. या काळात कंपनीने आपल्या क्षेत्रात येणाऱ्या प्रदेशासाठी काही नियम करण्याची गरज भासु लागली आणि याचीच प्रचीती म्हणुन कंपनीने या प्रदेशावर कायदे करण्याचे अधिकार कंपनी नियामक मंडळाकडे सुपुर्द केले. अधिकारक्षेत्रात कंपनीला कायदा करण्याची व तो परत घेण्याची तरतुद करण्यात आली हा पुर्ण कारभार इंग्लंडकडुन ठरवला ज्याचा सण 1826 आणि 1853 च्या कायद्याने प्रशासकीय आणि न्याय व्यवस्थेची स्थापणा केली.

1) रेग्यलंटिंग एक्ट 1773
2) पिटीशन इंडीया ॲक्ट 1784
3) चार्टर ॲक्ट 1833
4) भारतीय सुशासन कायदा 1858
5) राणीचा जाहीरनामा 1858
6) भारतीय कायदेमंडळाचा कायदा 1861
7) भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना 1885
8) भारतीय कायदेमंडळ कायदा 1892
9) मोर्ले मिंटो सुधारणा कायदा 1909

## भारतीय संसदीय शासन पध्दतीची पायाभरणी :—

सन 1892 च्या कायद्यानंतर खऱ्या अर्थाने भारतात संसदीय शासन पध्दतीला सुरुवात झाली. त्यातच 1885 मध्ये राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना स्वतंत्र चळवळीला झालेली सुरुवात हे सुध्दा राष्ट्रीयत्वाच्या भावनेला उभारी देणारे पावले ठरु लागले. सन 1889 च्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात संसदीय व्यवस्थेचे ठराव मोठया प्रतिसादात मंजुर झाला त्याचाच परिणाम म्हणुन 1893 ते 1909 पर्यंत भारतीय सदस्य कौन्सिल सदस्य म्हणुन नियुक्त करण्यात आले. त्या फिरोज शहा मेहता, आगाखान, गोपाळ कृष्ण गोखले यांचा समावेश होता. पुढे 1909 च्या कायद्यात देखील या सदस्य संख्येत वाढझाली. भारतीय विधान परिषदेत सदस्य संख्या 60 पर्यंत वाढवली त्यात 27 सदस्य हे नव्याने निवडुन आले होते कारण पुर्वीची सदस्य संख्या ही केवळ तेवढीच होती ही 27 सदस्य संख्येचीभर पडली. सण 1918 पर्यंत भारतीय संसदेचे कामकाज हे एकाच सदनाद्वारे चालु होते. पुढे त्यात 1919 च्या कायद्याने सुधारणा झाली व खऱ्या अर्थाने या कायद्याने संसदीय व्यवस्थेची पायाभरणी मजबुत होत गेली म्हणुन या पायाभरीतील काही कायद्यांचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते ते पुढील प्रमाणे.

1)मोटेगु चेम्सफोर्ड सुधारणा कायदा 1919
2)सन 1919 ते 1935 मधील घटनात्मक बाबी
3)सायमन कमिशन 1927
4)नेहरू रिपोर्ट 1928
5)गोलमेज परिषद 1930 — 1932
6)सन 1935 चा भारत प्रशासन कायदा
7)सन 1936 ते 1946 मधील महत्वाच्या घटना
8)ऑगस्ट ऑफर 1940
9)क्रिप्स शिष्टमंडळ 1942
10)कॅबिनेट मिशन 1946
11)भारतीय स्वातंत्र्य कायदा 1947
12)भारतीय संविधान समिती
13)भारतीय राज्यघटना

वरील सर्व कायद्याच्या माध्यमातून व भारतीय समाज व्यवस्थेमध्ये जी संसदीय शासन पध्दतीची राजकीय संस्कृतीच्या माध्यमातुन पाळेमुळे रुजली गेली रुजवली गेली त्या माध्यमातून भारतीय मानसिकता हे संसदीय शासन पध्दती च्या पध्दतीने निर्माण झाली होती. संसदीय शासन पध्दतीच्या माध्यमातून जगातील एक आदर्श राजकीय व्यवस्था निर्माण करण्याचा हेतू भारतीय संविधान निर्मात्यांचा असलेला आपल्याला पाहायला मिळतो. त्या अनुषंगाने भारतीय संविधान हे जगातील एक आदर्श संविधान जगातील एक आदर्श संसदीय शासन पध्दतीचा उल्लेख या ठिकाणी करता येतो. संसदीय शासन पध्दती मोठी लोकसंख्या असणाऱ्या देशासाठी मोठया भुप्रदेश असणाऱ्या देशासाठी आवश्यक आहे आणि तिची कार्यवाही कारणारी वा अंमलबजावणी करणारे राजकीय पक्ष विरोधी पक्ष दोघांनीही जबाबदारीने या व्यवस्थेची अंमलबजावणी केली. भारतीय संस्थेतील सर्व आयुधांचा आदरपुर्वक वापर केला गेला किंवा सर्वांचा आदर ठेवला गेला तर आम्हाला अपेक्षित असणारी राजकीय व्यवस्था निर्माण व्हायला वेळ लागणार नाही. परंतु आजच्या परिस्थितीत भ्रष्ट मानसिकता, अशिक्षीत मतदारांची मोठी संख्या आणि राजकीय हेकेखोरपणा किंवा धार्मिक भावनिक बाबींचा वापर करुन लोकशाही एका वेगळया मार्गाने नेण्याचा कट काही लोकांचा असल्याचे आपल्याला पाहायला मिळते. या परिस्थितीत भारतीय लोकाशाहीतील प्रसार माध्यम धर्मनिरपेक्षता समाजवाद राष्ट्रीय एकात्मता या मुल्यांचा गांभीर्याने विचार करणारे राजकीय पक्ष व सुजाण नागरीक यांच्या माध्यमातून ही संसदीय शासन पध्दती डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना व इतर घटना तज्ञांना अपेक्षित मार्गाने मार्गक्रमण करू शकते.

## संदर्भ ग्रंथ :—

1) कश्यप सुभाष सी, अनुवाद पाटील नब आपली संसद
2) रॉय गांधी तुलनात्मक शासन राजनिती, भारतीय भवन पब्लिशर्स

3) पाटील बी बी समग्र राज्यशास्त्र
4) लोटेराज भारतीय राष्ट्रवादी चळवळी आणि संवैधानिक विकास पिंपळापुरे प्रकाशन
5) लोकसभा के साठ वर्षे लोकसभा सचिवालय नई दिल्ली 2012